# पोलीस स्टेशनमध्ये देण्याचा अर्ज

प्रति,

मा. सहा. पोलीस निरीक्षक,

पो. स्टे. गाव ------------------------- ता.--------------------------- जि.-------------------------

विषय : पतीकडून त्याच्या संशयी स्वभावामुळे सातत्याने व जीवघेणी मारहाण होत असलेबाबत

महोदय

मी ---------------------------------------------------वय -------------- वर्ष ----------------

रा.---------------------------------------------------------------------------------------------

आपल्याला विनंतीपूर्वक अर्ज करते की,

माझे लग्न सात वर्षापूर्वी झाले. लग्नानंतर वर्षभर मी सणावाराच्या व नंतर बाळंतपणाच्या निमित्ताने माझ्या मामाच्या गावाला जात-येत होते. माझ्या माहेरची गरिबी व वडील दारुडे असल्याने माझ्या मामीने माझे सर्व सणवार व बाळंतपण केले. तेव्हापासून माझ्या मामाच्या गावात कोणीतरी माझा मित्र आहे असा संशय घेऊन माझ्या नव-याने मला मारहाण करण्यास सुरुवात केली.

माझ्या आईकडील नातेवाइकांनी त्याला खूप समजावण्याचा प्रयत्न केला. पण नव-याच्या वागण्यामध्ये काहीही फरक पडला नाही. त्याच्या सांगण्यावरून मी माझ्या मामाकडे व आईकडे जाणे दोन वर्षे बंद केले होते. पण त्या काळात शेतातून यायला थोडासा जरी उशीर झाला तरी कोणाला भेटायला गेली होतीस? असे घाणेरडे आरोप करून तो मला दररोज घाण शिव्या देतो व मारहाण करतो. रूपाली (वय वर्षे ५) व दीपाली (वय वर्षे ४) या दोन मुलींसमोर तो मला घाणेरड्या शिव्या देतो व मारतो.

मला त्याने हातात येईल त्या वस्तूने मारहाण केली आहे. माझ्या मुलींनाही तो मारहाण करतो. माझे सासू-सासरे त्याला घाबरतात. मला कोणीही सोडवायला येत नाही. त्यामुळे मला त्याच्या मारहाणीची आता भीती वाटते आहे. काल त्याने मला चुलीतल्या जळत्या लाकडाने मारले. त्याने ढकलल्यामुळे मी चुलीवरच्या तव्यावर कलंडले. त्यामुळे माझ्या हाताला आणि पाठीला भाजले आहे. आता मला त्याचा मार सहन करणे शक्य नाही म्हणून मी मुलींसह माहेरी आले आहे. माहेरी येण्यासाठी मी सास-यांकडून पैसे घेतले व सासू-सास-यांना सांगून आले. तसेच निघताना मी मुलींचे व माझे कपडे फक्त बरोबर आणले आहेत.

मला व मुलींना केलेल्या मारहाणीसंदर्भात आपण माझ्या नव-याविरुद्ध हा अर्ज दाखल करून घ्यावा व मला व माझ्या मुलीला कोणताही त्रास देऊ नये याबाबत त्याला समज द्यावी, ही विनंती.

कळावे.

आपली विश्वासू,

(सही/अंगठा)

(नाव ..............................)